Established: July 2001

II TAMASO MA JOTIRGAMAY II

TALE VIBHAG SHIKSHAN PRASARAK MANDAL'S

D.G. TATKARE ARTS & COMMERCE COLLEGE, TALA

Tal. Tala, Dist. - Raigad - 402 111.

Permanently Affiliated to University of Mumbai, NAAC Accredited with CGPA of 3.07 at 'A' Grade

Best College Award 2023-2024

Phone/ Fax: 02140 269575 / 9273499354, E-mail: dgtcollegetala1@yahoo.co.in

Govt. Recognized wide lettes No. NCC/Mashi-3 Date 29 Jan.2001 Muvis. 2003/(2/03) Mashi. 03 Dated 3 June 2003

Registration No. - 66 / 1988

Ref. No.: /20 /20 Date: / /20

तळा येथे कोंकण विभागीय आंतरमहाविद्यालयीन क्रॉस कंट्री मुले आणि मुली स्पर्धा यशस्वी संपन्न

तळे,(पुरुषोत्तम मुळे) – मुंबई विद्यापीठ अंतर्गत तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा जि रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने कोंकण विभागीय आंतरमहाविद्यालयीन क्रॉस कंट्री (मुले व मुली) स्पर्धा २०२५२६ मोठ्या उत्साहात व यशस्वीरीत्या संपन्न झाल्या. या स्पर्धेत कोंकण विभागातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग या तीन जिल्ह्यांतील मुंबई विद्यापीठाशी संलग्न असलेली एकूण २१ महाविद्यालये सहभागी झाली होती. यामध्ये १३ महाविद्यालये मुलांची तर ८ महाविद्यालये मुलींची होती. एकूण ८० खेळाडूंनी सहभाग नोंदविला असून त्यामध्ये ५० मुले व ३० मुली सहभागी होत्या.क्रॉस कंट्री मुले वैयक्तिक स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. स्वराज जोशी (ए. पी. महाविद्यालय, चिपळूण), द्वितीय क्रमांक कु. संदीप जोपशी (डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, महाड) तर तृतीय क्रमांक शिवम कुलाल (ए. सी. एस. महाविद्यालय, लांजा) यांनी पटकाविला.

क्रॉस कंट्री मुली वैयक्तिक स्पर्धेत प्रथम क्रमांक कु. निशा कुदळे (ए. सी. एस. महाविद्यालय, लांजा), द्वितीय क्रमांक ऐश्वर्या लोंडे (गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी) व तृतीय क्रमांक हर्षदा पांचाल (ए. सी. एस. महाविद्यालय, लांजा) यांनी मिळविला. संघ अजिंक्यपद मुली प्रथम क्रमांक ए. सी. एस. महाविद्यालय, लांजा (२२ गुण) द्वितीय क्रमांक गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी (३२ गुण) तृतीय क्रमांक डॉ. बाबासाहेब आंबेडकर महाविद्यालय, महाड (४२ गुण) संघ अजिंक्यपद मुले प्रथम क्रमांक ए. सी. एस. महाविद्यालय, लांजा (१५ गुण) द्वितीय क्रमांक गोगटे जोगळेकर महाविद्यालय, रत्नागिरी (२४ गुण) तृतीय क्रमांक डी. वी. जे. महाविद्यालय, चिपळूण (५१ गुण) या स्पर्धेच्या उद्घाटन प्रसंगी संस्थेचे उपाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम मुळे यांच्या हस्ते श्रीफळ वाढवून करण्यात आले.

उद्घाटन प्रसंगी माजी अध्यक्ष मा. श्री. चंद्रकांत म. रोडे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी संस्थेचे अध्यक्ष मा. श्री. मंगेश प्र. देशमुख होते. प्रमुख पाहुणे म्हणून संस्थेचे उपाध्यक्ष मा. श्री. पुरुषोत्तम मुळे उपस्थित होते. तसेच मुंबई विद्यापीठ कोंकण विभागाचे सहसचिव व समन्वयक माननीय श्री. शशांक उपशेटे, कोंकण विभाग समिती सदस्य श्री. रामचंद्र कदम, महाविद्यालयाचे प्र प्राचार्य भगवान लोखंडे,विविध महाविद्यालयातील क्रीडा शिक्षक, प्राध्यापक, प्राध्यापकेतर कर्मचारी तसेच स्वयंसेवक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी प्र. प्राचार्य भगवान लोखंडे यांनी द. ग. तटकरे महाविद्यालयाच्या थोडक्यात प्रगतीचा आढावा घेतला.

या प्रसंगी क्रीडा शिक्षक श्री. विजय तरटे, श्री. कसबे, मुंबई विद्यापीठ कोंकण विभागाचे सहसचिव तथा समन्वयक श्री. शशांक उपशेटे, उपाध्यक्ष श्री. पुरुषोत्तम मुळे, कार्यक्रमाचे अध्यक्ष श्री. मंगेश देशमुख यांनी खेळाडूंना क्रीडा विषयक उत्तम मार्गदर्शन केले. आपले मनोगत व्यक्त करतांना कुमारी स्वराज जोशी, कुमारी थापा, समन्वयक शशांक उपशेटे यांनी द. ग. तटकरे महाविद्यालयाच्या स्वयंसेवक, क्रीडा शिक्षक भरत चाळके आणि तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे पदाधिकारी व द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालयाचे प्राध्यापक व प्राध्यापकेतर कर्मचारी यांचे सर्व खेळाडूंची व्यवस्था उत्तम केल्या बद्दल कौतुक केले.

या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. डॉ. तृप्ती थोरात तर आभार प्रदर्शन डॉ. थोरात यांनी उत्तम प्रकारे केले आणि बक्षीस समारंभानंतर कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. स्पर्धेचे यशस्वी आयोजन केल्याबद्दल आयोजक समिती, क्रीडा विभाग व स्वयंसेवकांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर कॉलेज महाड मधील सौ. प्रतिभाताई सोनवणे उर्फ कांबळे सेवानिवृत्ती झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करताना जानकी सोसायटी चे सभासद.

मराठी महाराष्ट्राचा बुलंद आवाज
महासागर

आंतरमहाविद्यालयीन क्रॉस कंट्री क्रीडा स्पर्धेचे तळा येथे आयोजन.

तळा प्रतिनिधी ।

मुंबई विद्यापीठ व तळे विभाग शिक्षण प्रसारक मंडळाचे द.ग.तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा यांच्या संयुक्त विद्यमाने मुंबई विद्यापीठ कोकण विभागीय आंतरमहाविद्यालयीन क्रॉस कंट्री (मुले व मुली) क्रीडा स्पर्धा २०२५–२६ चे आयोजन दि.७ जानेवारी पासून करण्यात आले आहे.

सदर स्पर्धा सकाळी ६.३० वाजल्यापासून तालुका क्रीडा संकुल बोरघर हवेली तळा येथे सुरू होणार आहेत.या स्पर्धेत कोकण विभागातील रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यातील मुंबई विद्यापीठ अंतर्गत येणारे विविध महाविद्यालयांमधील १५० ते २०० खेळाडू सहभाग नोंदविणार आहेत.क्रॉस कंट्री ही सहनशक्ती, शारीरिक क्षमता व मानसिक दृढता यांची कसोटी पाहणारी क्रीडा स्पर्धा असून, या स्पर्धेमुळे ग्रामीण व दुर्गम भागातील खेळाडूंना आपली क्रीडा गुणवत्ता सादर करण्याची संधी मिळणार आहे. तसेच या स्पर्धेतून निवड होणारे खेळाडू मुंबई विद्यापीठाचे प्रतिनिधित्व करून पुढील आंतरविद्यापीठीय स्पर्धांमध्ये सहभागी होणार आहेत.

सदर क्रीडा स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी द. ग. तटकरे कला व वाणिज्य महाविद्यालय, तळा येथील प्राचार्य, क्रीडा विभाग, प्राध्यापक, कर्मचारी व स्वयंसेवक विद्यार्थी परिश्रम घेत आहेत.या क्रीडा स्पर्धेस क्रीडाप्रेमी नागरिक, विद्यार्थी व पालकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन आयोजकांच्या वतीने करण्यात आले आहे.